सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- २९२

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१८/०८/२०२२ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२५७ ते ठराव क्र.२९० हे आणि विशेष सभा दि.२०/०७/२०२२ रोजीचा ठराव क्र.२५६ व दि.०२/०९/२०२२ रोजीचा ठराव क्र.२९१ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले.

सदर कार्यवृत्तातील महासभा दि.१८/०८/२०२२ ठराव क्र.२८० मध्ये याकामी गठीत करणेत येणाऱ्या सनियंत्रण समितीमध्ये विद्यमान पदाधिकारी, सदस्य व पत्रकार यांचा समावेश करणेत यावा अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, दि.१८/०८/२०२२ ठराव क्र.२८१ अन्वये रेल्वे स्टेशन जवळील जकात नाका गांधी चौक पोलीस ठाणे,मिरज यांना भाडे तत्वाने देणेस प्रलंबित ठेवणेत आला होता. त्यामध्ये सदरचा नाका गांधी चौक पोलीस ठाणे,मिरज यांना भाडे तत्वाने देणेस ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशोद्दीन बागवान यांनी दिलेल्या उपसूचनेनुसार दि.१८/०८/२०२२ ठराव क्र.२८७ मध्ये महानगरपालिका क्षेत्रातील मिरज हिरा हॉटेल चौक ते लक्ष्मी मार्केट रस्ता हा रहदारीचा आणि मिरज शहरामध्ये प्रवेश करणेसाठी अत्यंत महत्वाचा असून,सदरचा रस्ता विकास आराखड्यात ६० फुटी मापाचा नमुद केलेला असून, सदरचा रस्ता ५० फुटी करणेकामी म.प्रा.न.अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मा.शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त दुरुस्तीसह सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

महासभा ठराव क्र.२५१ दि.२०/०६/२०२२ अन्वये पारित करणेत आलेल्या ठरावामध्ये २५% मनपा हिस्सा भरणेस ही सभा मान्यता देत आहे अशी दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.विष्णु माने D/. Sunanghi महापौर,

१) महासभा कार्यालय
२) मालमत्ता व्यवस्थापक
३) स.स.न.रु.
४) शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- २९३

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

समाजवादी पक्षाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष मुलायमसिंग यादव यांचे दि.१० ऑक्टोंबर २०२२ रोजी निधन झाले. त्यांनी भारताचे संरक्षण मंत्री म्हणून काम केले होते. तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून जनतेची सेवा केली आहे ते उत्तम संसदपटू व राजकारणी म्हणून परिचित होते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटुंबाच्या दु:खामध्ये ही सभा सहभागी होत असून, ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सदगती देवो अशी ही सभा ईश्वर चरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- श्री.संजय नायकू मेंढे

अनुमोदक :- श्री.मनोज रघुनाथ सरगर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- २९४

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

मा.ना.डॉ.सुरेशभाऊ खाडे यांची महाराष्ट्र राज्याच्या कामगार मंत्री पदी तसेच सांगली जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.अजिंक्य दिनकर पाटील

अनुमोदक :- श्री.गजानन शिवाजी अलदर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- २९५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या गटनेता तथा सभागृह नेता पदी मा.भारतीताई हेमंत दिगडे तसेच सभापती, स्थायी समिती पदी मा.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांची निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.अजिंक्य दिनकर पाटील

अनुमोदक :- श्री.गजानन शिवाजी अलदर

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi
महापौर,

महानालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- २९६

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

सांगलीचा सुपूत्र आकाश आनंदा मासाळ यांस खो-खो नॅशनल गेम मध्ये गोल्ड मेडल मिळालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- सौ.सविता दादासो मदने

अनुमोदक :- श्री.प्रकाश बाबासो ढंग

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Suryavanshi.

महापौर,

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- २९७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

मा.श्री.मल्लीकार्जुन खर्गे यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी निवड झालेबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- श्री.मयुरेश बाबासो पाटील

अनुमोदक :- श्री.तोफिक हारुण शिकलगार

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- २९८

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे अति.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील मेहता हॉस्पिटल जवळील रिक्षा स्टॉप चौकास तत्कालीन सांगली नगरपालिकचे बांधकाम सभापती तसेच शिक्षण मंडळ चेअरमन कै.मारुती तायाप्पा गाडे असे नामकरण करणेस अंतीम मान्यता देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.महासभा दि.१९/०४/२०२१ ठराव क्र.२३, १(ज) अन्वये पारित करणेत आलेला होता. सदर ठरावामध्ये प्रभाग क्र.२ मधील १०० फुटी रोड इदगाह झोपडपट्टी जंक्शन ते चौगुले मळा या पुर्व-पश्चिम ८० फुटी डी.पी.रस्त्यास स्व.डॉ.पतंगराव कदम असे नामकरण करणेस सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. त्यामध्ये पुर्व-पश्चिम ८० फुटी डी.पी.रस्त्या ऐवजी दक्षिणोत्तर ८० फुटी डी.पी.रस्त्यास स्व.डॉ.पतंगराव कदम असे नामकरण करणे अशी दुरुस्ती करुन, मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हकरती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.उत्तम बाळकृष्ण साखळकर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली पद्माळरोड (पद्माळ फाटा) येथील महापालिका हद्दीतील स.नं.३१ ब/२ या क्षेत्रातील रहिवाशी भागास लक्ष्मी कॉलनी असे नामकरण करणेबाबत तेथील स्थानिक रहिवाशी यांनी मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर भागास लक्ष्मी कॉलनी असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हकरती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.योगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज प्रभाग क्र.२० अ मधील ख्वॉजा वसाहत येथील प्रमुख चौकास नुर-ऐ-हुसेन चौक असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार सूचना / हकरती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.योगेंद्र थोरात.

अनुमोदक :- श्री.उत्तम साखळकर.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Surywanshi

महापौर,

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- २९९

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे अति.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका प्रभाग क्र.१७ मधील नाना-नानी उद्यानास स्व.बाळासाहेब हरीभाऊ सावंत (आबा) नाना-नानी उद्यान असे नामकरण करणेस अंतीम मान्यता देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री: मेंहुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,

अनुमोदक :- श्री: शोभा मोहिते

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३००

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे अति.आयुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र.१० मधील सांगली कॉलेज व्हाया टिंबर एरिया ते माता रमाई उद्यान रस्त्यास (पूर्व-पश्चिम) साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे असे नामकरण करणेस अंतीम मान्यता देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. रोडजी मोहिते D. P. Suryavanshi महापौर,

महानगरपालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०१

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२२/०९/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज येथील बेडग रोड वरील काच कारखान्या समोर महापालिकेच्या खुल्या भूखंडामध्ये (स.नं.३३८/१,३३८/२(जुना) व २८४/१, २८४/२ (नविन) या दोन्ही जागा महापालिकेकडे कब्जेपट्टीद्वारे वर्ग झालेले आहेत. सदर दोन्ही रेखांकनातील खुल्या जागा या संलग्न असून, जागेचे एकूण क्षेत्र ३०७५चौ.मी. इतके असून, महापालिका एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुद क्र.३.४.७ (I) (II) मधील तरतुदीनुसार सदरचे काम अनुज्ञेय होवू शकते. त्यानुसार सदर खुल्या भूखंडात छत्रपती संभाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा,गडकिल्ल्याची प्रतिकृती (स्केल मॉडेल) लायब्ररी इत्यादीचा समावेश करुन शंभूसृष्टी विकसीत करणेस व मिरज मध्ये एक दर्जेदार पर्यटन स्थळ व महाराष्ट्राचा इतिहास दर्शविणारे ठिकाण विकसीत करणेस व याकामी नकाशे, आराखडा, अंदाजपत्रक तयार करणेस महापालिका पॅनेलवरील वास्तुविशारद मे.एस.पी.तायवडे- पाटील अॅंड असोसिएटस्, सांगली यांची नियुक्ती करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर शंभूसृष्टी विकसीत करणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या शासकीय परवानग्या प्रशासनाने तात्काळ घेणेस व त्यासाठी आवश्यक असणारी समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली शहरातील विविध संघटना, सर्व पक्षातील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी, महापालिकेचे सन्मा.सदस्य यांनी केलेल्या मागणीनुसार छत्रपती संभाजी राजे यांचा पुतळा बसविणेकामी महापौर यांचे दालनामध्ये आयोजित केलेल्या बैठकीमध्ये सर्वानुमते चर्चा होवून, स्थळ पाहणीअंती सांगली प्रतापसिंह उद्यानामधील जागा निश्चित करणेत आली. त्यानुसार महापालिकेच्या प्रतापसिंह उद्यान येथील जुन्या फायर स्टेशनच्या मागील बाजूस असलेल्या जागेत सद्या कारगील युद्धातील जुना रणगाडा बसविणेत आलेला आहे. त्याठिकाणी श्री.छत्रपती संभाजी राजे यांचा पुतळा सुशोभिकरणासह उभा करणेस व त्याकामी मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, श्री.छत्रपती संभाजी राजे यांचा पुतळा सुशोभिकरणासह उभा करणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या शासकीय परवानग्या प्रशासनाने तात्काळ घेणेस व त्यासाठी आवश्यक असणारी समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.निरंजन सुरेश आवटी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

श्री.छत्रपती संभाजी राजे महाराज यांच्या अचाट धैर्य,अजोड पराक्रम,असामान्य शौर्य प्रयत्नांची पराकाष्ठा, समाजकारण,राजकारण, अर्थकारण,धर्मकारण अशा अनेक क्षेत्रातील निर्विवाद वर्चस्व गाजविणाऱ्या श्री.छत्रपती संभाजी महाराजांची तेजोमय कारकिर्द आजच्या पिढीस ज्ञात होणेसाठी महापालिकेच्या मिरज येथील कर्मवीर भाऊराव चौक येथील स.नं.१ आणि ५ पैकी या मनपाच्या स्टेडियम जागेवर श्री.छत्रपती संभाजी राजे महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा चबुतऱ्यासह बसविणेस व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.पुतळा-३११६/प्र.क्र.३०८/२९ मंत्रालय मुंबई यांचे मार्गदर्शक तत्वानुसार पुतळा समिती स्थापन करुन, पुर्णाकृती पुतळा बसविणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, श्री.छत्रपती संभाजी राजे महाराज पुर्णाकृती पुतळा चबुत-यासह बसविणेकामी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या शासकीय परवानग्या घेणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.सविता दादासो मदने,सौ.संगित विठ्ठलराव खोत.श्री.विष्णू आण्णासाहेब माने व सौ.कल्पन्ना कल्लाप्पा कोळेकर यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली-मिरज रोड वरील राजे यशवंतराव होळकर चौक येथे राजे यशवंतराव होळकर यांचा अश्वारुढ पुतळा बसवून, चौक सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. सदर चौकामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा न्यायालय,प्रशासकीय इमारत आहे. सदर सांगली शहराच्या मध्यवर्ती विजयनगर येथील चौकास राजे यशवंतराव होळकर चौक असे नामकरण करणेत आलेले असून, सदर चौकामध्ये राजे यशवंतराव होळेकर यांचा अश्वारुढ पुतळा बसविणेबाबत विविध सामाजिक संघटना, समाज बांधवांच्या कडून वारंवार मागणी होत आहे. त्यानुसार सांगली मिरज रोड वरील राजे यशवंतराव होळकर चौक विजयनगर येथे राजे यशवंतराव होळकर यांचा अश्वारुढ पुतळा सुशोभिकरणासह उभा करणेस व त्याकामी मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद यांची नियुक्ती करणेस तसेच, मा.शासन स्तरावर निधी मागणीचा प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, राजे यशवंतराव होळेकर यांचा अश्वारुढ पुतळा बसविणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या शासकीय परवानग्या प्रशासनाने तात्काळ घेणेस व त्यासाठी आवश्यक असणारी समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे जन्म शताब्दी निमित्त राज्य शासनाकडून सांगली जिल्ह्याच्या ठिकाणी भव्य स्मारक उभा करण्याचा मानस असून, सांगली शहरामध्ये स.नं.११७/३ब या जागेवर स्मारक उभे करणेसाठी महापालिका पॅनेल वरील वास्तुविशारद यांची नियुक्ती करुन, प्लॅन व एस्टीमेट तयार करुन, सदर कामी अनुदान मागणीसाठी प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.धिरज सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi.

महापौर,

अनुमोदक :- श्री.मैनुद्दीन बागवान.

महानगरपालिका सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०२

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१६/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.जिल्हाधिकारीसो यांनी सन २०१९-२० लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेंतर्गत शिल्लक रक्कमेतून मंजूर केलेल्या ०६ कामांच्या प्रशासकीय मान्यतेपैकी काम नं.४ कुपवाड वॉर्ड क्र.२ सिद्धार्थ नगर येथील सि.स.नं.३३४६ मध्ये बौद्ध समाज सामाजिक सभागृह इमारत बांधणे र.रु.२२,४०,०००/- मात्र कामाची निविदा प्रक्रिया रद्द करुन सदर कामासाठी मंजूर एकत्रीत ३ निधींच्या कामासाठी संपूर्ण कार्यान्वीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज यांना करुन, मनपा कडील सदर कामाला मंजूर असलेली र.रु.२२,४०,०००/- मात्रची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज यांना वर्ग करणेस मान्यता देणेकामी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदर ठिकाणी र.रु.२२,४०,०००/- मात्रच्या प्रस्तावास स्थायी समितीने मंजूरी दिलेली असून, त्यास वर्क ऑर्डर दिलेली असलेने, काम मंजूर केलेनंतर परत सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज यांना वर्ग करणे योग्य होणार नसलेने, सदर कामासाठी मंजूर असलेला निधी सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज यांचेकडे वर्ग करणे ऐवजी याकामी मंजूर असलेला दोन कामाचा र.रु.४० लक्ष मात्रचा निधी महापालिकेकडे वर्ग करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग,मिरज यंत्रणेस कळविणेत यावे व महापालिका बांधकाम विभागामार्फत सदरचा निधी प्रस्तुत कामगिरीसाठी खर्च करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, कुपवाड सि.स.नं.३३४६ क्षेत्र ६९ चौ.मी.ही जागा मनपाची आहे. त्यामध्ये सद्या विद्यमान बौद्ध समाजाची इमारत आहे. सदर मिळकतीच्या समोर सर्वसाधारण ८.५ मी.x ७ मी.चा गावठाण मधील Unnumbred मोकळी जागा असलेचे प्रत्यक्ष शीट नं.४६ वरुन निदर्शनास येते. कुपवाड चे सि.स.नं.३३४६ चे क्षेत्रामध्ये त्याच्या समोरील काही जागा ८.५ मी.x ७ मी. या मापाची यामध्ये समाविष्ठ केलेस त्यास कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही. तरी सदरचे ८.५ मी.x ७ मी. क्षेत्र सि.स.नं. ३३४६ मध्ये समाविष्ठ करणेकामी त्याची मोजणी करुन घेणेकामी प्रशासनाने याबाबत योग्यती कायदेशिर कार्यवाही ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री. विष्णू माने

ठराव सर्वानुमते मंजुर

D. P. Sunyaranthi

अनुमोदक :- Tshik श्री. तोफिक शिकलगार

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४

दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०३

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१६/०६/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड वॉर्ड क्र.२ येथील ईदगाह चौक ते चौगुले मळा स्व.डॉ.पतंगराव कदम रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचा र.रु.६८,३८,५००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीस्तव पाठविणेस विषययपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्या सौ.सविता दादासो मदने यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे मान्यता देत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१९ मधील जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा न्यायालय शेजारी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी खुप मोठा नाला असून, सदरचा भाग हा महापालिका क्षेत्रातील मध्यवर्ती ठिकाणी असून, या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात रहदारी व वर्दळ असते. सदरचा नाला बांधीव नसलेने व सदर नाल्याला संरक्षक भिंत नसल्यामुळे पावसाळ्यात व अतिवृष्टी वेळी सदर नाल्याचे पाणी या भागातील नागरी वस्त्यामध्ये शिरुन जनजीवन विस्कळीत होते व नाल्या जवळील घरे पुरबाधीत होतात त्यामुळे सदरचा विजयनगर ते कुंभार मळा धामणीकडे जाणारा नाला तातडीने बांधणे आवश्यक आहे अन्यथा या भागातील घरे सुरक्षित राहू शकणार नाहीत. तरी सदरचा जिल्हा न्यायालय जवळील विजयनगर ते कुंभार मळापर्यंतचा नाला बांधकाम करणे व संरक्षक भिंत बांधणेसाठी र.रु.८ कोटीचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून, सदर कामासाठी मा.जिल्हा नियोजन समिती मधून र.रु.८ कोटी मात्रचा निधी मागणीसाठी मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे मान्यता देत आहे.

सन २०२१-२२ करिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात विशिष्ठ नागरी सेवा व सुविधा पुरविणे योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ३२ कामांसाठी दि.०७/०७/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महानगरपालिकेस र.रु.५ कोटी मंजूर झाले असून, सदर शासन निर्णयाद्वारे सदर कामासाठी कार्यान्वीत यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,मिरज असून, सदरचा प्रस्ताव सार्व.बांधकाम विभाग,मिरज यांचेकडून मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी पाठविणेस मान्यता देणेकामी महापालिका सार्व.बांधकाम विभाग यांचेकडून दि.१९/१०/२०२२ रोजी नगरसचिव विभागाकडे विषयपत्र प्राप्त झाले असून, सदर शासन निर्णयाद्वारे सदर कामासाठी कार्यान्वीत यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,मिरज असून, महानगरपालिका क्षेत्रातील खालील एकूण ३२ कामांचा प्रस्ताव सार्व.बांधकाम विभाग,मिरज यांचेकडून मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	र.रु. (लक्ष)
१.	प्रभाग क्र.१ वर्धमान नगर येथील शरद नलवडे घर ते तुळजाई निवास घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.	१०.१५
२.	प्रभाग क्र. १ ढवळेश्वर कॉलनी जवळील माळी घर ते माने घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.	१५.०७
३.	प्रभाग क्र. १ प्रकाशनगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.	१५.११
४.	प्रभाग क्र. १ मधील यशवंतनगर मधील आठवडा बाजार मध्ये बाजार कट्टा करणे.	२९.६७
५.	प्रभाग क्र.२ कुपवाड येथील बिरजदार घर ते जमदाडे घर ते कोष्टी घर रस्ता काँक्रिटीकरण करणे.	११.००

६.	प्रभाग क्र.२ कुपवाड येथील स्वामी समर्थ मंदिर ते ओढा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.	१९.००
७.	प्रभाग क्र.२ कुपवाड येथील रुपनर घर ते शरद पाटील सर ऑफिस पर्यंत गटर करणे.	
८.	प्रभाग क्र.८ विजयनगर पूर्व मधील श्रीनगर कॉलनी येथील मगदूम प्लॉट येथील अंतर्गत रस्ते करणे.	२०.००
९.	प्रभाग क्र.८ विजयनगर पूर्व मधील घरपट्टी ऑफिस येथील चंदनशिवे घर ते निकम घर अंतर्गत रस्ते करणे.	१५.००
१०.	प्रभाग क्र.९ मधील अमित देसाई घर ते शेळके घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.	२१.०८
११.	प्रभाग क्र.९ मधील ऋतुजा अपार्टमेंट ते रसाळे वखार पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.	१३.९२
१२.	प्रभाग क्र.१० मधील अथर्व लक्झारियाच्या पुर्वेस उत्तर-दक्षिण रस्ता डांबरीकरण करणे.	१९.५०
१३.	प्रभाग क्र. १० गोल्डन पार्क मधील अंतर्गत रस्ते करणे.	१०.५०
१४.	प्रभाग क्र. ११ निरंकार कॉलनी अंतर्गत रस्ते व गटर करणे.	३०.००
१५.	प्रभाग क्र. १२ मधील माधवनगर जकात नाका ते पद्माळ कडे जाणाऱ्या महानगरपालिका क्षेत्रातील साईराम नगर, महालक्ष्मी नगर येथील अंतर्गत रस्ते करणे.	३०.००
१६.	प्रभाग क्र.१२ मधील कर्नाळ पोलिस चौकी ते दत्त मेडीकल येथील रस्ता डांबरीकरण करणे.	२०.००
१७.	प्रभाग क्र. १२ मधील दत्त मेडीकल ते पटेल चौक येथील रस्ता डांबरीकरण करणे.	२०.००
१८.	प्रभाग क्र. १३ सांगलीवाडी मधील गाडगीळ प्लॉट अंतर्गत रस्ते करणे.	३०.००
१९.	प्रभाग क्र. १३ सांगलीवाडी मधील शाळा नं. १६ ते विठ्ठल मंदीर पर्यंत रस्ता करणे.	
२०.	प्रभाग क्र.१४ नवभारत चौक ते टिळक चौक रस्ता करणे.	२५.५२
२१.	प्रभाग क्र. १४ सिटी हायस्कूल समोरील रस्ता करणे.	
२२.	प्रभाग क्र. १४ मधील महावीर कर्वे यांच्या घरासमोरील व मागील बाजूची गटर करणे.	१०.५५
२३.	प्रभाग क्र. १४ विसावा चौक छ. शिवाजी महाराज पुतळ्या समोरील रस्ता करणे.	
२४.	प्रभाग क्र. १४ खिलारे वाड्या जवळील गोदावरी आनंदाणी घर ते श्रीकांत खिलारे घर गटर करणे.	१३.९३
२५.	प्रभाग क्र. १४ प्रमोद पाटील घर ते सुरेंद्र बोळाज घरापर्यंत कॉंक्रिटीकरण करणे.	
२६.	प्रभाग क्र.१६ आंबेडकर रोड राजाभाऊ जगदाळे प्रवेशव्दार व्यंकटेश चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.	२०.००
२७.	प्रभाग क्र. १७ जुनी धामणी पिटके यांच्या घरासमोरील रस्ता करणे.	१५.९६
२८.	प्रभाग क्र. १७ दत्तनगर हर्ष हॉटेल जवळ पाटील घरासमोरील रस्ता करणे.	१४.०४
२९.	प्रभाग क्र. १८ खिलारे मंगल कार्यालयाजवळील प्रजिमा ८५ ते प्रथमेश कांबळे घरापर्यंत रस्ता करणे.	३०.००
३०.	प्रभाग क्र. १८ आकाशवाणीच्या मागे प्रजिमा ८५ ते नारायण येनकलेव रस्ता करणे.	
३१.	प्रभाग क्र. १९ पुजारी प्लॉट येथील मगदुम घर ते आवळे घर ते अंतर्गत रस्ता करणे.	२०.००
३२.	प्रभाग क्र. १९ पुजारी प्लॉट येथील आवळे घर ते गोसावी घर व टेके घर ते शिवदत्त अपार्टमेंट रस्ता करणे.	२०.००
	एकूण रक्कम रुपये (लक्ष)	५००.००

शहर अभियंता

सूचक :- श्री. विरज सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suryavanshi

महापालिका सचिव
मी. मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- सौ. सविता मदने

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०४

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (शहरी नागरी दारिद्रय निर्मुलन कक्ष) यांचे दि.०८/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली शहरातील स.क्र.२६९ (नविन स.क्र.१८०) आणि मिरज शहरातील स.क्र.६,७ अ आणि १८१ (नविन स.क्र.१३३) या महानगरपालिकेच्या भूखंडावर प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे योजनेतील घटक क्र.३ खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती (Affordable Housing in Partnership) योजना राबविणे आणि त्याकरीता सदर भूखंडावरील सद्याचे असणारे आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये आरक्षण फेरबदल करणेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणेकामी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव ही सभा रद्द करीत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. जगन्नाथ ठोकळे D.P. Suryavanshi महापौर,

टेंडर अभियंता (PMAY)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०५

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१२/०५/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

विकास योजना सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सांगली खणभाग सि.स.नं.१ पैकी या जागेमधून जाणाऱ्या विकास योजनेमधील ९.० मी.रस्ता करणेसाठी सूचना व हरकती मागविणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सन्मा.सदस्य श्री.संदीप सुरेश आवटी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या मिरज प्रभाग क्र.३ च्या क्षेत्रातील हरी मंदिर ते कमान वेस पर्यंतचा रस्ता १८ मीटर मंजूर असून तेथील भागात मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती स्थित आहे. त्यामुळे सदरचा रस्ता रुंदीकरण करणेस अडचणी निर्माण होणार आहे. सदरच्या रस्त्यावरुन वाहतुकही तुरळक प्रमाणात सुरु असते. त्यामुळे सद्या असलेला रस्ता तसाच ठेवणेबाबत मा.शासनाच्या मान्यतेसाठी पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मेंहदीन बागवान ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शोभनी मोहिते

D.P.Suryawanshi
महापौर,

ल.स.नं.२

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०६

विषय क्रमांक :- १२

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.०८/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील सांगली शहर,सांगलीवाडी,कृष्णाघाट मिरज येथील पुरबाधित आपत्तीग्रस्त बेघर नागरीकांसाठी कायम स्वरुपी निवारा उपलब्ध करुन देणेसाठी सांगली मिरज रोडवरील चंदनवाडी परिसरातील स.नं.९०९ व ९४५ मधील हौसिंग फॉर डिसहाऊस्ड चे आरक्षण असलेली जमिन भूसंपादन करणेसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एन.डी.आर.एफ) व राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एस.डी.आर.एफ) मधून प्राप्त होणाऱ्या २०% निधी अंतर्गत खरेदीसाठी मा.शासनाकडून निधी प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी सभागृहात झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली शहर सांगलीवाडी कृष्णाघाट मिरज या भागातून श्री.कृष्णा नदी वाहत आहे. सदर नदीस सन २००५,२००६,२०१९,२०२१ या वर्षामध्ये आलेल्या महापुरामुळे सांगली, सांगलीवाडी व मिरज येथील नदीकाठावरील नागरी वस्ती मध्ये महापुराचे पाणी शिरुन आतोनात नुकसान झालेले आहे. सद्यस्थितीत २००० पेक्षा अधिक घरे ब्ल्यु लाईन मध्ये येत असून, त्यांचे स्थलांतर / पुनर्वसन करणे आवश्यक असून, आपत्तीग्रस्त नागरीकांसाठी कायम स्वरुपी निवारा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

महापालिका सांगली मिरज रोड वरील चंदनवाडी परिसरातील स.नं.९०९ व ९४५ मधील हौसिंग फॉर डिसहाऊस्ड चे आरक्षण असलेली खाजगी मालकीची जमिनीवरील आरक्षणाचे ८०,००० चौ.मी. पैकी १०४५०.२५ चौ.मी.क्षेत्रावरील आरक्षण महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये व्यवगत झालेले असून, उर्वरित ६९५४९.७५ चौ.मी. क्षेत्रावर हौसिंग फॉर डिसहाऊस्ड चे आरक्षण अद्याप कायम असून, त्याठिकाणी अंदाजे २००० घरांचे बांधकाम होवू शकते. त्यासाठी सदरची जागा भूसंपादन करणेचे झाल्यास त्यासाठी सदर जागेचे मुल्यांकन नविन भूसंपादन कायद्यानुसार र.रु.६४,९६,१६,२५१/- इतके होत असून, महापालिकेची सद्याची आर्थिक परिस्थिती पाहता महापालिकेस भूसंपदानाची रक्कम जमिन मालकास देणे शक्य नाही. त्यामुळे महापालिका क्षेत्रातील आपत्तीग्रस्तांचे स्थलांतर / पुनर्वसन करणेसाठी क्षेत्रीय बांधकामासाठी संदर्भीय शासन निर्णयानुसार जमिन खरेदीसाठी मा.शासनाकडून र.रु.६४,९६,१६,२५१/- मात्रची रक्कम १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एन.डी.आर.एफ) व राज्य आपत्ती प्रसिसाद निधी (एस.डी.आर.एफ) मधून प्राप्त होणाऱ्या २०% निधी मंजूर होणेस मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणसे ही सभा मान्यता देत आहे.

स.स.न.र.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- श्री. कोडजी मोहिते. D. Suryavanshi
महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०७

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.२०/०९/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

माळबंगला जलशुद्धीकरण केंद्र मुख्य संतुलन टाकी पासून यशवंतनगर पंप हाऊस संपपर्यंत ३५० एम.एम.व्यासाची डी.आय.नविन मेन पाईप टाकणे अंदाजित र.रु.१,३६,५८,४९७/- मात्रची कामगिरी करणेस मा.महासभेची शिफारश होणेसाठी धोरणात्मक निर्णयार्थ सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

माळबंगला जलशुद्धीकरण केंद्र मुख्य संतुलन टाकी पासून यशवंतनगर पंप हाऊस संपपर्यंतची जुनी एसी प्रेशर ग्रव्हीटी मेन पाईप लाईन खराब व कालबाह्य झालेली आहे. सदरची पाईप सुमारे ४५ वर्षापुर्वीची आहे. सदरची लाईन सिमेंटची असून, अधिक दाब आल्यास वरचेवर पाईप लिकेज होत आहे व त्यामुळे यशवंतनगर टाकीद्वारे होणारा पाणी पुरवठा बाधित होत आहे. त्यामुळे सदरची पाईप लाईन बदलणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर नविन पाईप लाईन टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले असून, सदर कामास र.रु.१,३६,५८,४९७/- इतका खर्च अपेक्षित असून, सदरचा खर्च महापालिकेस प्राप्त झालेल्या १५ व्या वित्त आयोगाच्या शिल्लक रक्कमेतून शासन निर्णयातील अनुदान वितरण व विनियोगाच्या निश्चित कार्यपद्धतीला अनुसरुन करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर कामी निविदा मागविणेस ही सभा मान्यता देत असून, निविदा दर मंजुरीसाठी मा.महासभेसमोर प्रस्तावा सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- श्री. संजय मेढे ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री. रोडजी मोहिते महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०९

विषय क्रमांक :- १४

सोबतचे उपायुक्त (सार्व. बांध. विभाग,सांगली) यांचे दि.०८/०८/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज रोड (१०० फुटी रोड) Hybrid Annuity पद्धतीने विकसीत करणे अंदाजत्रकीय र.रु.७६,०१,६७,२८२/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(१) अन्वये जाहिर ई-महाटेंडर पद्धतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे व इतर अनुषंगिक खर्चासह मान्यता देणेकामी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सांगली प्रमाणे मिरज व कुपवाड येथील रस्ते करणेकामी प्रशासनाकडून प्रस्ताव सादर न झाल्याने, सदरचे प्रस्ताव प्राप्त होईतोपर्यत सदरचा प्रस्ताव ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान. ठराव सर्वानुमते मंजुर

D/Suryavanshi

अनुमोदक :- श्री. शेडजी मोहिते. महापौर,

टेंडर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०४ दिनांक :- १९/१०/२०२२

ठराव क्रमांक :- ३०९

विषय क्रमांक :- १५

सोबतचे उपायुक्त (नगरसचिव विभाग) यांचे दि.०७/१०/२०२२ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील कलम ३ मध्ये सार्वत्रिक निवडणूकीनंतर निवडणूकीचे निकाल अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्यानंतर लगतच घेण्यात येणाऱ्या महापालिकेच्या बैठकीत, पाच व्यक्तींचे नामनिर्देशीत पालिका सदस्य म्हणून महानगरपालिका करील अशी तरतुद असल्याने, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीनंतर नगरमंडळ अस्तित्वात आलेवर अधिनियमातील कलम ४ अन्वये एकाद्या व्यक्तीकडे पालिका प्रशासननाचे विशेष ज्ञान अथवा अनुभव असेल ती व्यक्ती नामनिर्देशीत पालिका सदस्याच्या पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशीत केली जाणेस पात्र असेल अशी अर्हता निश्चित करणेत आलेनुसार मा.महासभेच्या मान्यतेने पक्षीय तौलनिक संख्याबळानुसार पाच नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणेत आली होती.

तद्नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नामनिर्देशित सदस्य श्री.सागर रामचंद्र घोडके यांनी सदस्य पदाचा राजीनामा दिल्यानंतर मा.महासभा ठराव क्र.९१ दिनांक २०/०८/२०२१ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) मधील तरतुदीमधील शिफारशीनुसार सदर रिक्त जागेवर श्री.हरिदास पंडित पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नामनिर्देशित सदस्य पदी निवड करणेत आलेली होती. श्री.हरिदास पंडित पाटील यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७ अन्वये पक्षाच्या पक्षश्रेष्ठींच्या आदेशानुसार दि.२०/०९/२०२२ रोजी नामनिर्देशित सदस्य पदाचा स्वखुशीने मा.आयुक्तसो यांचेकडे राजीनामा सादर केलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ चे कलम ७ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या नामनिर्देशित सदस्य पदाच्या रिक्त झालेल्या जागी नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशन करणेसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार नामनिर्देशनासाठी आवश्यक असणारी अर्हता विचारात घेवून, नामनिर्देशित सदस्य नियुक्त करणेकामी श्री.हरिदास पंडित पाटील यांचे रिक्त झालेल्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेता यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) मधील तरतुदीनुसार केले शिफारशीनुसार सदर रिक्त जागेवर श्री.बागवान जमिल शमशोद्दीन यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्विकृत सदस्य पदी निवड करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नगरसचिव
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- श्री. मैनुद्दीन बागवान.

अनुमोदक :- श्री. रोडमी मोहिते.

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P. Suryavanshi

महापौर,